दिनांक : 27 एप्रिल, 2010

**बँक कर्मचाऱ्यांना समाधानकारक असा 17.5 % पगारवाढ देणारा ऐतिहासिक 9वा** द्विपक्ष करार बँक कर्मचारी सेना महासंघाने आय.बी.ए. समवेत संपन्न केला आणि या करारावर बँक कर्मचारी सेना महासंघातर्फे स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

बँक कर्मचारी सेना महासंघ आय.बी.ए. बरोबर 3 ऱ्या द्विपक्ष पगारवाढीच्या करारावर सही करत आहे. **दिनांक 27 मार्च 2000, 2 जून 2005 आणि 27 एप्रिल 2010 रोजी अनुक्रमे 7वा, 8वा आणि 9वा द्विपक्ष करार सखोल चर्चा / बोलणी करुन संपन्न करण्यात आले.**

**बँक कर्मचारी सेना महासंघाची स्थापना 1995** साली करण्यात आली आणि सभासद संख्येच्या आधारे, प्रखर लढ्यानंतरच इंडियन बँक्स असोशिएशनने आमच्या संघटनेस मान्यता प्राप्त संघटना म्हणून मान्यता दिली.

**9वा द्विपक्ष** पगारवाढीच्या करारासंबंधीचे मागणी पत्र आय.बी.ए. ला दिल्या नंतर **चर्चेच्या 23 फेऱ्या** नंतर या करारास मूर्त स्वरुप देण्यास आम्ही यशस्वी झालो. या दरम्यान अनेक अडथळ्यांवर मात करुन बँक कर्मचारी सेना महासंघाने स्वतंत्र पणे या द्विपक्षीय करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

**ह्या काळात शिवसेनेचे जेष्ट नेते आणि बँक कर्मचारी सेना महासंघाचे अध्यक्ष मा. श्री. सुधीर जोशी** यांनी अमूल्य मार्गदर्शन केल्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. **शिवसेना सचिव मा. श्री. अनिल देसाई** यांनी बँक कर्मचारी सेना महासंघाचे नेतृत्व केले.

**9व्या द्विपक्षीय** पगारवाढीचा करार आणि पेन्शन (निवृत्ती वेतन) संदर्भात तपशिल देत आहोत.

# जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

**राजन तुळसकर**
**(सरचिटणीस)**

---

1) <u>वेतनमान (पे स्केल) 01.11.2007 ते 30.04.2010</u>

### अ) लिपिक वर्ग वेतनमान (मुळ पगार / बेसिक पे)

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6200 | → | 400 | → | 7400 | → | 500 | → | 8900 | → | 600 | → | 11300 | → | 700 |
| | | 3 | | | | 3 | | | | 4 | | | | 7 |
| 16200 | → | 1300 | → | 17500 | → | 800 | → | 18300 | | | | | | |
| | | 1 | | | | 1 | | | | | | | | |

### ब) अधिनस्थ कर्मचारी वेतनमान (मुळ पगार / बेसिक पे)

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5500 | → | 200 | → | 6300 | → | 250 | → | 7550 | → | 300 | → | 8750 | → | 350 |
| | | 4 | | | | 5 | | | | 4 | | | | 3 |
| 9800 | → | 400 | → | 11000 | | | | | | | | | | |
| | | 3 | | | | | | | | | | | | |

**2) वेतनमान (पे स्केल) 01.05.2010 पासूनचा नविन पगार खालील प्रमाणे**

**अ) लिपिक वेतनमान (मुळ पगार / बेसिक पे)**

7200 → 400/3 → 8400 → 500/3 → 9900 → 600/4 → 12300 → 700/7

17200 → 1300/1 → 18500 → 800/1 → 19300

**नोट :** लिपिक पदावर असलेल्या कर्मचाऱ्यांना मूळ पगार (बेसिक पे) **रु. 19,300/-** झाल्यास त्याला लिपिक पदावरील **स्टॅगनेशन पॉईंट किंवा सर्वोच्च वेतन स्तर असे म्हणतात.** स्टॅगनेशन पॉईंट नंतर प्रत्येक लिपिक कर्मचाऱ्याला एकूण **सहा स्टॅगनेशन इन्क्रीमेंट्स ( सर्वोच्च वेतनमानाची पगारवाढ म्हणजेच रु.800/- )** दर तीन वर्षांनी एक ह्या प्रमाणे देण्याची व्यवस्था आहे. अशा प्रकारे एकूण 06 स्टॅगनेशन इन्क्रीमेंट्स घेतल्यानंतर **7 वे स्टॅगनेशन इन्क्रीमेंट्स 9व्या द्विपक्ष करारानुसार रु. 800** तीन वर्षा ऐवजी दोन वर्षांनी देण्यात येईल.
ह्याचा लाभ अशा कर्मचाऱ्यांना मिळेल ज्यांना पूर्वी 06 वे स्टॅगनेशन इन्क्रीमेंट प्राप्त झाले आहे. सातवे म्हणजे शेवटचे स्टॅगनेशन इन्क्रीमेंट प्राप्त झालेले नव्हते अशा प्रकारे एकूण **07 वे स्टॅगनेशन इन्क्रीमेंट्स घेतल्यानंतर मूळ वेतन (बेसिक पे) अधिकतम (मॅक्झिमम) रु. 24900/- होईल.**

**ब) अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे वेतनमान (मुळ पगार / बेसिक पे)**

5850 → 200/4 → 6650 → 250/5 → 7900 → 300/4 → 9100 → 350/3

10150 → 400/3 → 11350

नोट : अधिनस्थ पदावर असलेल्या (टाईम स्केल वेतनमानावरील पार्ट टाईम स्वीपर सहित) कर्मचाऱ्यांच्या मूळ पगार (बेसिक पे) रु.11,350/- झाल्यास त्याला स्टॅगनेशन पॉईंट म्हणजेच अधिनस्थ पदावरील सर्वोच्च वेतन स्तर असे म्हणतात. स्टॅगनेशन पॉईंट नंतर प्रत्येक अधिनस्थ कर्मचाऱ्यालाही एकूण सहा स्टॅगनेशन इन्क्रीमेंट्स म्हणजेच सर्वोच्च वेतनमानाची पगारवाढ रु. 400/- दर दोन वर्षांनी एक ह्या प्रमाणे देण्याची व्यवस्था आहे. अशा प्रकारे एकूण 7 वे स्टॅगनेशन इन्क्रीमेंट्स 9व्या द्विपक्ष करारानुसार घेतल्यानंतर अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन (बेसिक पे) अधिकतम (मॅक्झिमम) रु. 14150/- होईल.
ह्याचा लाभ अशा अधिनस्थ कर्मचाऱ्यांना मिळेल ज्यांना पूर्वी 06 वे स्टॅगनेशन इन्क्रीमेंट प्राप्त झाले आहे व सातवे म्हणजे शेवटचे स्टॅगनेशन इन्क्रीमेंट प्राप्त झालेले नव्हते.

**2) महागाई भत्ता (डी.ए)**

दिनांक 01/11/2007 च्या प्रभावी तारखेपासून लिपिक व अधिनस्थ कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता दर 0.15% असेल.

**3) घर भाडे भत्ता (एच.आर.ए.) (लिपिक व अधिनस्थ पदांवरील कर्मचाऱ्यांकरीता)**

| क्र. | घरभाडे क्षेत्र (एरिया) | घरभाडे दर (%) |
|---|---|---|
| 1. | 45 लाख किंवा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातील कर्मचाऱ्यांना | 10% |
| 2. | 12 लाख किंवा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातील व संपूर्ण गोवा राज्यातील कर्मचाऱ्यांना | 9 % |
| 3. | वरील दोन्ही क्षेत्र सोडून 5 लाख किंवा अधिक लोकसंखेच्या क्षेत्रातील व केंद्रशासित प्रदेशातील आणि संघ राज्याच्या राजधानी शहरातील कर्मचाऱ्यांना | 7.5% |
| 4. | 5 लाखा पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील कर्मचाऱ्यांना | 7% |

**4) प्रवास भत्ता (ट्रान्स्पोर्ट अलाऊंस)**

दिनांक 01/11/2007 या तारखेपासून लिपिक / अधिनस्थ कर्मचारी या दोन्ही पदावर असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रवासीभत्ता खालील प्रमाणे दिला जाईल.

1) मूळ वेतनाच्या 15 व्या स्टेजपर्यंत दरमहा रु. 225/-

2) मूळ वेतनाच्या 16 व्या स्टेजपासून दरमहा रु. 275/-

3) सर्व अर्धवेळ काम करणाऱ्या कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या तासानुसार प्रवास भत्ता मिळेल.

**5) <u>विशेष भत्ता : प्रमुख पदे : लिपिक वर्ग</u>**

| पद | 01.11.2007 ते 30.04.2010 | 01.05.2010 पासून मिळणारा भत्ता | 01.05.2010 पासून रु. 1000 मूळ वेतनात समाविष्ठ नंतरचा विशेष भत्ता |
|---|---|---|---|
| 1. टेलिफोन ऑपरेटर | 210 | 1500 | 500 |
| 2. टेलर 'अे' | 690 | 1500 | 500 |
| 3. स्टेनोग्राफर | 1020 | 1500 | 500 |
| 4. हेड कॅशियर - 'सि' | 1150 | 1500 | 500 |
| 5. कॉम्प्यूटर ऑपरेटर 'अे' | 1250 | 1500 | 500 |
| 6. हेड कॅशियर - I | 1270 | 1500 | 500 |
| 7. हेड कॅशियर - II | 1780 | 1780 | 780 |
| 8. कॉम्प्यूटर ऑपरेटर 'बी' | 1500 | 1500 | 500 |
| 9. स्पेशल असिस्टंट | 2180 | 2180 | 1180 |

**6) <u>विशेष भत्ता : प्रमुख पदे : अधिनस्थ कर्मचारी वर्ग</u>**

| पद | 01.11.2007 ते 30.04.2010 | 01.05.2010 पासून मिळणारा भत्ता | 01.05.2010 पासून रु. 350 मूळ वेतनात समाविष्ठ नंतरचा विशेष भत्ता |
|---|---|---|---|
| 1. लिफ्टमन | 350 | 350 | 00 |
| 2. वॉचमन | 350 | 350 | 00 |
| 3. कॅश प्यून | 350 | 350 | 00 |
| 4. आर्म गार्ड | 590 | 590 | 240 |
| 5. बिल कलेक्टर | 590 | 590 | 240 |
| 6. दप्तरी | 690 | 690 | 340 |
| 7. हेड प्यून | 800 | 800 | 450 |
| 8. इलेक्ट्रिशन | 1600 | 1600 | 1250 |
| 9. ड्रायव्हर | 1800 | 1800 | 1450 |

**7) <u>पदवीधर भत्ता (प्रोफेशनल क्वालिफिकेशन अलाऊन्स)</u>**

**अ) फक्त पदवीधर - वेतनमानाची शेवटची स्टेज म्हणजे मूळ वेतन 19300 झाल्यानंतर**

एक वर्षानंतर दरमहा रु. 250/-
दोन वर्षानंतर दरमहा रु. 490/-

**ब) पदवीधर व JAIIB - मूळ वेतन 19300 झाल्यानंतर** एक वर्षानंतर दरमहा रु. 250/-
दोन वर्षानंतर दरमहा रु. 490/-
तीन वर्षानंतर दरमहा रु. 740/-

**क) पदवीधर व CAIIB - मूळ वेतन 19300 झाल्यानंतर** एक वर्षानंतर दरमहा रु. 250/-
दोन वर्षानंतर दरमहा रु. 490/-

तीन वर्षानंतर दरमहा रु. 740/-
चार वर्षानंतर दरमहा रु. 990/-
पाच वर्षानंतर दरमहा रु. 1230/-

**8) स्थिर व्यक्तिगत भत्ता (फिक्स पर्सनल पे - एफ.पी.पी.)**

| | | लिपीक वर्ग | अधिनस्थ वर्ग |
|---|---|---|---|
| 1. | 45 लाख किंवा अधिक लोकसंख्येचे स्थान | रु. 940 | रु. 470 |
| 2. | 12 लाख किंवा अधिक व 45 लाखापेक्षा कमी व गोवा राज्य | रु. 930 | रु. 465 |
| 3. | 5 लाखापेक्षा जास्त व केंद्रशासित प्रदेशातील आणि संघराज्याची राजधानी | रु. 920 | रु. 460 |
| 4. | 5 लाखा पेक्षा वर नमूद केलेल्या तीन श्रेणी व्यतीरिक्त | रु. 915 | रु. 460 |

**9) वैद्यकीय भत्ता (मेडिकल अेड)**

दिनांक 01/11/2007 पासून प्रत्येक कर्मचाऱ्यांस वार्षिक रु. 2000/- वैद्यकीय भत्ता म्हणून मिळेल.

**10) लिव फेअर कन्सेशन (एल.एफ.सी.)**

| क्र. | पद | दोन वर्षे ब्लॉक | चार वर्षे ब्लॉक | प्रवास वर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | लिपीक वर्ग | 2000 कि.मि. | 4000 कि.मि. | AC II TIER Mail/Express |
| 2. | अधिनस्थ कर्मचारी | 2500 कि.मि. | 5000 कि.मि. | AC III TIER Mail/Express |
| **टीप - वेतन करार सही झालेल्या दिवसापासून वरील बदल लागू होईल.** | | | | |

**एल.एफ.सी. चे रोखीकरण करण्यासाठी ह्या करारापासून फक्त एक दिवसाच्या आकस्मिक रजेची आवश्यकता आहे.**

**भाडोत्री / खाजगी वाहनाद्वारे एल.एफ.सी. यात्रा सुविधा**

एल.एफ.सी. अंतर्गत खाजगी / भाडोत्री वाहनाद्वारे व पूर्व परवानगीने प्रवास केल्यास कर्मचाऱ्याला प्रति कि.मि. रु. 3/- प्रमाणे प्रवास भाडे मिळेल.

**11) हॉस्पिटलायझेशन - थोडक्यात महत्वाची माहिती**

कर्मचारी रुग्णालयात दाखल झाल्यास त्याला खालील प्रमाणे खर्च मंजूर करण्यात येईल.
कर्मचारी रुग्ण असल्यास बेड चार्जेस - 100% किंवा अधिकतम रु. 450/- प्रति दिवस
आय.सी.यू.(ICU) बेड चार्जेस 100% किंवा अधिकतम रु. 550/- प्रति दिवस.औषधे खर्च 100%
ऑपरेशन खर्च, विविध वैद्यकीय तपासणी खर्च, ॲम्ब्यूलंस खर्च आणि पॅकेज चार्जेस चा पूर्ण तपशिल करारात उपलब्ध आहे.

**12) कुटुंबाची व्याख्या** - 9व्या द्विपक्ष कराराच्या परिच्छेद क्र. 18 नुसार कर्मचाऱ्याची पत्नी अथवा पती कर्मचाऱ्यावरती अवलंबून असलेली लग्न न झालेली मुलं (ज्यामध्ये दत्तक घेतलेली मुलं देखिल समाविष्ट आहेत) तसेच आई वडिल जे कर्मचाऱ्यावरती अवलंबून आहेत आणि सर्व साधारणपणे त्या कर्मचाऱ्यासोबत रहातात व 40% शारिरीक विकलांग असलेलं कर्मचाऱ्यांचे भाऊ/बहीण.

**टीप :** 1) अवलंबून असलेली मुले व आई वडिल यांचे मासिक उत्पन्न रु. 3500/- पेक्षा अधिक असता कामा नये .
2) जर आई वडिल यांच्या पैकी कोणत्याही एकाचे उत्पन्न किंवा दोघांचे मिळून एकत्रित मासिक उत्पन्न रु.3500/- पेक्षा जास्त असल्यास ते त्या कर्मचाऱ्यांवरती अवलंबून नाहीत असे गृहीत धरले जाईल.
3) महिला कर्मचाऱ्यांचे जन्मदाते आई वडिल किंवा सासू सासरे या पैकी एकच अवलंबून असल्याचे गृहीत धरले जाईल व त्यांचे देखील मासिक उत्पन्न वर नमुद केलेल्या रु. 3500/- पेक्षा जास्त असता कामा नये आणि ते त्या महिला कर्मचाऱ्यांकडे सर्वसाधारण पणे रहात असले पाहिजे.

**वरिल कुटुंबाची व्याख्या वैद्यकीय सुविधा व प्रवास भत्ता या दोन्ही बाबीकरता राहील.**

**13) अर्धवेळ सफाई कामगार**

1 मे 2010 पासून जे अर्धवेळ कामगार ज्यांना आठवड्याचे 3 किंवा 6 तास  सफाई काम व ठराविक पगार देण्यात येत होता त्या सर्व कामगारांना 1/3 स्केलवर घेण्यात येईल. नवीन भरती केल्यास 1/3 स्केल वरच अर्धवेळ सफाई कामगार म्हणून नोकरीत घेतले जातील.

**14) थांबण्याचा भत्ता (HALTING ALLOWANCE)**

दिनांक 1 मे 2010 या तारखेपासुन कर्मचाऱ्यांना बँकेच्या कामाकरता आपले मुळ गांव किंवा मुळ कार्यक्षेत्र सोडून अन्य ठिकाणी गेल्यास खाली दर्शवल्याप्रमाणे राहील.

| क्र. | कर्मचाऱ्याचे पद | ठिकाणाची लोकसंख्या 12 लाखापेक्षा अधिक | ठिकाणाची लोकसंख्या 5 लाखापेक्षा अधिक | ठिकाणाची लोकसंख्या 5 लाखापेक्षा कमी |
|---|---|---|---|---|
| 1. | लिपीक कर्मचारी | रु. 500/- प्रति दिन | रु. 375/- प्रति दिन | रु. 300/- प्रति दिन |
| 2. | अधिनस्थ कर्मचारी | रु. 375/- प्रति दिन | रु. 250/- प्रति दिन | रु. 185/- प्रति दिन |

**15) धुलाई भत्ता**

दिनांक 1 मे 2010 पासुन फक्त अधिनस्थ कर्मचाऱ्यांना धुलाई भत्ता रु. 100/- दरमहा दिला जाईल.

**16) सायकल भत्ता**

दिनांक 1 नोव्हेंबर 2007 पासुन फक्त अधिनस्थ कर्मचाऱ्यांना सायकल भत्ता (बँकेच्या कामा निमित्त बाहेर जाणाऱ्यांना) रु. 75/- दरमहा दिला जाईल.

**17) बाळंतपणाची रजा**

बाळंतपणाची रजा पूर्ण सेवा काळात जास्तीत जास्त 12 महिने व एक वेळेस जास्तीत जास्त 6 महिने एवढी मिळते. ह्या कराराअंतर्गत हिस्टरेक्टॉमी (Hysterectomy) साठी जास्तीत जास्त 45 दिवस एकूण 12 महिन्याच्या मर्यादे अंतर्गतच रजा मिळेल.

**18) पेन्शन (निवृत्ती वेतन)**

असंख्य राष्ट्रीयकृत बँकेतील कर्मचारी ज्यांनी पूर्वी पेन्शनचा पर्याय स्विकारला नव्हता त्यांना नविन कराराद्वारे पेन्शन स्विकारण्याचा आणखीन एक पर्याय उपलब्ध झाला आहे. परंतू त्या करीता त्यांना मिळणाऱ्या थकबाकीतून (पेन्शनचा अधिभार रुपये 1800/- कोटी) 30% दिल्यानंतर व जमा झालेल्या पि.एफ. मधून व्यवस्थानाचा हिस्सा व त्यावरील व्याजासह परत केल्यानंतरच मिळेल.

29 सप्टेंबर 1995 रोजी बँकेत सेवेत असलेल्या परंतू त्यानंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना किंवा निवृत्त होऊन मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना पेन्शनचा आणखीन एक पर्याय उपलब्ध झाला आहे. त्यांना देखील वर नमुद केल्या प्रमाणे 30% अधिभार व निवृत्तीसमयी मिळालेल्या व्यवस्थापनाचा पी.एफ. चा हिस्सा परत करणे अनिवार्य आहे.

सदर पेन्शन याजना पूर्वीच्या पेन्शन योजनेप्रमाणेच आहे. ज्यामध्ये कर्मचाऱ्यांना 1/3 बेसीक पेन्शन विकण्याचा पर्याय उपलब्ध आहे. ही पेन्शन योजना पूर्वी प्रमाणेच महागाई भत्याशी निगडीत आहे.

पेन्शन योजने अंतर्गत मृत्यू पावलेल्या पेन्शन धारकाच्या पति / पत्नीस फॅमिली पेन्शन मिळेल.

# !! बँक कर्मचारी सेना महासंघ झिंदाबाद !!